**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ८०/२०१८-१९/ 115 दिनांक: ११.०६.२०१९

**आदेश**

**आदेश केस क्र. ८० (२०१८-२०१९)**

**तक्रारदार -** १) मे. हायटेक बलेन्सींग ॲन्ड इंजिनिअरिंग — **अर्जदार**
२) श्री प्रिसीटेक इंजिनिअर्स
३) मे. हाय कॉस्ट इंडस्ट्रीज
प्लॉट क्र. ५७-५८ ,५६/५९, ५३ लक्ष्मी इस्टेट
तिळवणी ता. हातकणंगले जि. कोल्हापूर

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर, — **पक्षकार**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, कोल्हापूर

२) कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय इचलकरंजी

३) उपकार्यकारी अभियंता
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उप विभाग इचलकरंजी "ग्रामिण "

**कोरमः**-१.श्री ए.व्ही. देशपांडे, अध्यक्ष
२.श्री. एन.के. ताडे, सदस्य सचिव,
३. ३. श्री. पी. एस. पुजारी, ग्राहक सदस्य,(आजारपणामुळे गैरहजर)

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. महावितरण

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**आदेश**

मी ए.व्ही. देशपांडे अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे

11/6/19

तक्रारदारानी , दाखल केलेली तक्रार, थोडक्यात खालील प्रमाणे आहे. :-

तक्रारदार क्रमांक १ व २ यांनी अनुक्रमे दिनांक १८.०५.२००७ व दिनांक २७.१२.२००६ रोजी आस्तिवात असणा-या विद्युत जोडभारात वाढ करणे तर तक्रारदार क्रमांक ३ यांनी दिनांक २७.१२.२००७ रोजी नवीन विज जोडणी करता अर्ज दाखल केलेले होते. सदर तीनही विविध कारणाचे, विविध दिनांकाचे विविध जागेतील अर्ज वि.प. कंपनीने एकत्र करुन या सर्वाचे एकत्रित अंदाजपत्रक DDS (divided distribution system ) या योजनेतून दिनांक ३०.०३.२००७ रोजी मंजूर केलेले आहे. कार्यकारी अभियंता इचलकरंजी यांनी अधीक्षक अभियंता कोल्हापूर यांना, मार्च २००७ मध्ये पाठविलेल्या अंदाजपत्रकाची रक्कम ३,१९,४२६/- इतकी आहे तक्रारदारांचे कथनानुसार विज कायदा २००३ ची अंमलबजावणी दिनांक २०.०१.२००५ रोजी होऊन जुन्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे जागी महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी आस्तीत्वात आलेली असून देखिल मार्च-२००७ मध्ये मंजूरी देण्यात आलेली आहे. ती महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ या नावानेदेण्यातआलेली आहे नव्या विद्युत कायदयामध्ये DDS या योजनेला कोणतेही स्थान नसलेल्या योजनेतून विज पुरवठा मंजूर करण्यात आलेला आहे. विज कायदा २००३ च्या कलम ४३ नुसार विज वितरण करण्याकरता लागणारे इन्फ्रॉटक्चर उभे करण्याची जबाबदारी विज वितरण कंपनीची आहे. DDF (Dedicated distribution facility) या योजने व्यतिरिक्त इतर सर्व विज जोडणी प्रकरणांत विज वितरण कंपनीनेच Infrastructure उभे करावयाचे आहे, अशी supply code विनियम २००५ शेडयूल ऑफ चार्जेस मंजूरी दिनांक २००६ मधील तरतूद आहे. Infrastructure उभे करावयासाठी लागणारी आर्थिक तरतूद विद्युत अधिनियम २००३ चे खंड ७ मधील तरतूदीनुसार टॅरिफ मधूनच करण्यात येत आहे. या सर्व कायदेशीर तरतूदीमध्ये DDS ला मान्यताच नाही. तक्रारदारांनी, लागणारे Infrastructure उभे केल्यानंतर पुढील प्रमाणे नमूद केलेल्या रक्कमा त्या त्या कोटेशन प्रमाणे तक्रारदाराकडून भरुन घेण्यात आलेल्या आहेत

१. <u>**हायटेक बॅलन्सींग व इजिनिअरिंग**</u> :- कोटेशन क्रमांक १७९३ दिनांक १२.०४.२००७ , १०% ICH रु. ६५०/- अधिक ARC रु. ५०/- अधिक SA(III) रु. ३२०००/- अधिक RRBV रु. २४०/- = रु. ३२,९४०/- पावती क्र. ६०८०५४६ दिनांक १८.०४.२००७ रोजी भरले

२. २) <u>**मे. प्रेसी-टेक इंजिनिअरर्स**</u> :- कोटेशन क्रमांक १७९२ दिनांक १२.०४.२००७ , १०% ICH रु. ६५०/- अधिक ARC रु. ५०/- अधिक SA(III) रु. १८०००/- अधिक RRBV रु. २३०/- = रु. १८९३०/- पावती क्र. ६०८०५४७ दिनांक १८.०४.२००७ रोजी भरले .

३. <u>**मे. हाय-कास्ट इडस्ट्रींजः-**</u> कोटेशन क्रमांक १७९१ दिनांक १२.०४.२००७ , १०% ICH रु. ६५०/- अधिक SA(III) रु. ३०,०००/- अधिक RRBV रु. १००/- अधिक DTC Meter charges रु. १९,०००/- अधिक १.३ % सुपरव्हीजन चार्जेस रु. ४४१/- = रु. ५३,८५०/- पावती क्र. ६०८२६५३ दिनांक ३०.०४.२००७ रोजी भरले .

तक्रारदाराच्या कथनानूसार वरनमूद काळात दिनांक २०.०१.२००५ पासून विद्युत कायदा २००३ ची अंमलबजावणी देशात सुरु झालेली असून त्यातील कलम १८५ नुसार त्या आधि आस्तित्वात असणारे कायदे व त्यातील येणारी अधिकारीता ही निरसित झालेली आहे. राज्य नियमक आयोग यांनी निर्गमित केलेली विद्युत पुरवठा संहिता व पुरवठया इतर अटी अधिनियम २००६ हे दिनांक २०.०१.२००५ पासून अंमलात आलेले आहेत. त्यामध्ये कुठेही DDS ही संकल्पना नमूद केलेली नाही. तसेच शेडयूल ऑफ चार्जेस मंजूरी केस क्र. ७०/२००५ मधील आदेश क्रमांक ८.०९.२००६ मंजूरी झालेल्या शेडयूल ऑफ चार्जेसमध्ये देखिल DDS ही

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. महावितरण

संकल्पना मंजूर नाही. तरी देखिल विजवितरण कंपनीच्या इचलकरंजी विभागीय कार्यालयातून DDS योजने खाली अंदाजपत्रकाला मंजूरी देण्यात येत आहे. चलनांमध्ये नमूद केलेले १०% लेंबर चार्जेस , १.३ % सुपरव्हीजन चार्जेस , RRBV, Meter charges हे कोणत्या कारणाकरिता व कोणत्या अधिकारात नमूद करुन वसूल केलेले आहेत हे प्रतिवादी यांनी स्पष्ट करणे गरजेचे आहे . Electricity Act. , Supply code किंवा शेडयूल ऑफ चार्जेसमध्ये या सर्वाना मंजूरीच नाही. राज्य आयोगानी पाठविलेल्या दिनांक २०.०७.२०१७ च्या पत्रामध्ये, सप्लाय कोडचा अंमलबजावणी दिनांक किंवा शेडयूल ऑफ चार्जेस मंजूरी दिनांक यानंतर मंजूरी विपरितचा खर्च ग्राहकास परत करावा. सबब अंतर्गत तक्रार निवारण कक्ष यांच्याकडे प्रस्तुत तक्रारदारांनी दिनांक १९.०९.२०१८ रोजी तक्रार दाखल केली असता दिनांक १४.११.२०१८ रोजी ही तक्रार मे. अरुधंती कलर्स कार्टून्स दाखल केलेल्या तक्रार अर्जातील आदेशासह एकत्रिरित्या ना मंजूर केलेली आहे. अंतर्गत तक्रार निवारण कक्षाचा आदेश हा अनेक गोष्टीने बेकायदेशीर आहे. खालील कक्षाने ORC(P) किंवा DDS कायदेशीर किंवा बेकादेशीर आहे यांचा कोणताही प्रमार्श न घेता ग्राहकांनी ओआरसी योजनेतून भरणा केलेल नसल्याने ORC(P) किंवा DDS खालील परतावा देता येणार नाही असे कारण देऊन सदर तक्रार नामंजूर केलेली आहे. तथापि सदर तक्रार कालबाहय झालेली आहे किंवा नाही याबद्दल कोणताही निष्कर्ष खालील कक्षाने काढलेला नाही. केवळ विषयानंतर करुन ती तक्रार खारीज केली असल्याने तक्रारदारांना तो आदेश मान्य नाही. या कारणाकरता प्रस्तुत तक्रारदार तक्रार दाखल करित आहेत. या कथनावरुन तक्रारदारांनी अंदाजपत्रकानुसारचा आपला खर्च रक्कम रु. ३,१९,४२६/- हा चलन भरले दिनांक माहे एप्रिल २००७ पासून प्रत्यक्ष परतावा देय दिनांकापर्यन्त विद्युत कायदा २००३ चे कलम ६२ चे उप कलम ६ नुसार व्याजासह परत करण्याचा आदेश व्हावा व सदर परतावा हा तिन्ही ग्राहकांच्या विज देयकातून समानरित्या परतावा मिळावा तसेच हाय-कास्ट इन्स्ट्रीजकडून भरुन घेतलेली मिटरची रक्कम रु. १९,०००/- ही माहे एप्रिल २००७ पासून प्रत्यक्ष परतवा देय दिनांकापर्यन्त सव्याज परत करण्याचा आदेश व्हावा, अशा मागणी केलेल्या आहेत.

प्रस्तुत प्रकरणांची नोटीस मिळाल्यानंतर विज वितरण कंपनीने कार्यकारी अभियंता विभागीय कार्यालय इचलकरंजी यांचेमार्फत हजर होऊन खालील प्रमाणे आपले म्हणणे मांडले आहे.

मे. हायटेक बलेन्सींग ॲन्ड इंजिनिअरिंग, प्लॉट क्र. ५७५८ , लक्ष्मी इंड, इस्टेट तिळवणी ग्राहक क्र. २५०४९०१९००५४ यांचे सविस्तर तक्रार अर्जानुसार व इचलकरंजी ग्रामिण उपविभाग येथील दस्ताऐवजा नुसार वरील औद्योगिक विज जोडणी मंजूरी पत्र EE/ICH /DDS/08/07-08 पत्र क्र. ०८६_ दिनांक १०.०४.२००७ प्रमाणे मंजूरी पत्रातील काम पूर्ण झा लेवर विज जोडणी देण्यात आलेली आहे. सदरचे काम ग्राहकांनी स्वखर्चाने करायची तयारी दर्शविली व त्यास त्यांची पुर्ण संमती होती, सदरची वीजजोडणी दिल्यापासून यापूर्वी ग्राहकांनी कोणताही परतावा मागितला नाही. सदर काम करताना ग्राहकांनी कोणताही विरोध दर्शविला नाही. सदर मंजूरी पत्रानुसार १०० ते २०० के.व्ही.ए. चे रोहित्रची क्षमता वाढ करणेसाठी ग्राहकांनी लेखी पत्र दिले आहे. त्यानुसार अंदाजपत्रक रक्कम रु. ३,१९,५००/- चे इतके काम झालेनंतर खालील ग्राहकांना विज जोडणी देणेत आलेली आहे. सदर ग्राहकांस तातडीने विज जोडणी आवश्यक असलेने, सदर ग्राहकांनी स्वखर्चाने व स्पखुषीने कोणताही विरोध न दर्शविता, DDS योजनेमधून काम केले आहे. सदर ग्राहकांनी विद्युत पुरवठयाच्या अटी व शर्ती विनियम मधील मुद्दा क्र. ३.३.८ नुसार मान्यता प्राप्त ठेकेदाराकडून काम करुन घेतले आहे. सदर रोहित्रा वरुन फक्त मे. हायटेक बलेन्सीग , प्रिसीटेक इंजिनिअर्स मे. हायकास्ट इंडस्ट्रीज यांना विद्युत पुरवठा केला जातो व इतर कोणतेही ग्राहकास विद्युत पुरवठा केला जात नाही.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

11/6/2025

सदर ग्राहकांनी खालील प्रमाणे रक्कमा महावितरणकडे पावती क्र ६०८०५४६ , ६०८०५४७ व ६०८२६५३ ने जमा केलेली आहे.

| अ.क्र. | ग्राहकांचे नाव | SLC चार्जेस | डिटीसी मिटरींग चार्जेस | अनामत रक्कम | कॅपॅसिटर टेस्टींग फी | प्रोसेसिंग फी | १.३% सुपरव्हीजन चार्जेस | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | में.हायटेक बलेन्सींग | ६५०/- | - | ३२,०००/- | २४०/- | ५०/- | - | ३२,९४०/- |
| २ | प्रिसीटेक इंजिनिअर्स | ६५०/- | - | १८,०००/- | २३०/- | ५०/- | - | १८,९३०/- |
| ३ | मे. हायकास्ट इंडस्ट्रिज | ६५०/- | १९,०००/- | ३०,०००/- | - | १००/- | ४१००/- | ५३,८५०/- |

वरील रक्कमा व्यतिरिक्त ग्राहकांनी इंन्फ्रास्ट्रक्चर उभारणेसाठी आवश्यक असणा-या २,८८,४००/- रुपये रक्कमेचा भरणा महावितरणकडे केलेला नाही.

| अ.क्र. | ग्राहकांचे नाव | ग्राहक क्रमांक | मंजूर भार | वाढिव मागणी | एकूण भार |
|---|---|---|---|---|---|
| १ | में.हायटेक बलेन्सींग | २५०४९०१९००५४ | ४० अश्वशक्ती | ३२ अश्वशक्ती | ७२ अश्वशक्ती |
| २ | प्रिसीटेक इंजिनिअर्स | २५०४९०१९३८२७ | ५० अश्वशक्ती | १८ अश्वशक्ती | ६८ अश्वशक्ती |
| ३ | मे. हायकास्ट इंडस्ट्रिज | २५०४९०१९८४२० | ०० अश्वशक्ती | ३० अश्वशक्ती | ३० अश्वशक्ती |

मा. सर्वोच्च न्यायालय यांचे अपील क्रमांक ४३०५/२००५ मधील निकाल व परिपत्रक क्र. २५०७९ दिनांक २९-१२-२०१७ नुसार पात्र ग्राहकांना फक्त SLC, ORC and Meter cost जे महाविरण कंपनीकडे दिनांक २०.०१.२००५ ते २०.०५.२००८ या कालावधीमध्ये भरणा केलेला आहे ते परत करणेचा आदेश देणेत आला आहे. त्यामुळे ग्राहकांनी मागितलेला पायाभूत आराखडा परतावा व मा. सर्वोच्च न्यायलाचा निकाल व वर नमूद परिपत्रक परस्पर वेगवेगळे विषय असलेचे दिसून येते.

सदर तक्रारदार यांचे लेखी अंदाजपत्रक हे DDS योजनेमधून केलेचे व रोहित्रची क्षमता वाढ हे DDS योजनेतून करणेत आलेले आहे व तक्रारदारांस वाढिव लोड दिलेले दिसून येते. तसेच सदर ग्राहकाचा अर्ज २००७-०८ मधील असलेने कोणत्याही प्रकारचे गा-हाणे ग्राहक तक्रार निवारण मंच व मा. लोकायुक्त अधिनियम २००३ चे नियम ६.६ नुसार दोन वर्षाच्या आत सादर करणे गरजेचे होते. यामुळे सदरचे गा-हाणे हे मंचा समोर दाखल करणेस योग्य कालावधी संपून गेला असलेचे मंचाच्या निदर्शनास या कार्यालयातर्फे आणून येत आहे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

11/6/2019

प्रस्तुत प्रकरणी आमच्या निष्कर्षाकरिता खालील मुद्दे उपस्थित होतात.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | तक्रारदारांची तक्रार मुद्दतीत आहे काय? | नाही |
| २ | तक्रारदाराची Infrastructure cost ची परताव्याची योग्य आहे काय? | Dones not survive |
| ३ | अंतिम आदेश | खालील प्रमाणे |

६. आमच्या वरील निष्कर्षाची कारणे खालील प्रमाणे आहेत.

**कारणमिमांसा**

७. **मुद्दा क्रमांक १:-** प्रस्तुत प्रकरणी खालील बाबी या उभयपक्षी मान्य आहेत.

१. तक्रारदारांना मंजूरी पत्र क्र. EE/ICH/DDS/08/07-08 पत्र क्र. ०८६ दिनांक१०.०४.२००७ प्रमाणे औद्योगिक विजजोडणी, मंजूरी पत्रातील कामे पूर्ण झाल्यानंतर देण्यात आलेली आहेत.

२. सदर मंजूरी पत्रानुसार १०० ते २०० के.व्ही.ए. चे रोहित्राची क्षमता वाढ करण्याकरिता ग्राहकांने लेखी पत्र दिलेले होते.

३. अंदाजपत्रकानुसार रु. ३,१९,५००/- चे काम झालेले असून त्यानंतर तक्रारदारांना विज जोडणी देण्यात आलेली आहे.

४. तक्रारदारांनी विद्युत पुरवठया अटी व शर्ती विनियम २००५ मधील विनियमत ३.३.८ नुसार मान्यता प्राप्त ठेकेदाराकडून काम करुन घेतलेले आहे.

५. तक्रारदारांनी खालील प्रमाणे रक्कमा महावितरणकडे पावती क्र. अनुक्रमांक ६०८०५४६ , ६०८०५४७ व ६०८२६५३ जमा केलेली आहे.

| अ.क्र. | ग्राहकांचे नाव | SLC चार्जेस | डिटीसी मिटरींग चार्जेस | अनामत रक्कम | कॅपॅसिटर टेस्टींग फी | प्रोसेसिंग फी | १.३% सुपरव्हीजन चार्जेस | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | में.हायटेक बलेन्सींग | ६५०/- | - | ३२,०००/- | २४०/- | ५०/- | - | ३२,९४०/- |
| २ | प्रिसीटेक इंजिनिअर्स | ६५०/- | - | १८,०००/- | २३०/- | ५०/- | - | १८,९३०/- |
| ३ | मे. हायकास्ट इंडस्ट्रिज | ६५०/- | १९,०००/- | ३०,०००/- | - | १००/- | ४१००/- | ५३,८५०/- |

६. अंदाजपत्रकानुसार Infrastructure cost उभारणी खर्च रु. २,८८,४००/- अभिप्रेत होता.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. KOLHAPUR ZONE महावितरण

11/6/2015

तक्रारदाराचे कथनानुसार सदरच्या वाढिव विज जोडणी करता Infrastructure उभारणी खर्च त्यानी केलेला आहे. विज वितरण कंपनीने आपल्या लेखी म्हणण्यात तक्रारदारांने अंदाजपत्रकात नमूद केलेली Infrastructure cost रुपये २,८८,४००/- विज वितरण कंपनीकडे भरलेली नाही. असे म्हटलेले आहे. तक्रारदारांनी सदर Infrastructure cost करता खर्च केलेल्या रक्कमेचा परतावा या प्रकरणी व्याजासह मागितला आहे. Infrastructure उभारणीचा खर्च कोणत्या तारखेला केला, हे तक्रारदारांनी आपल्या तक्रार अर्जामध्ये नमूद केलेले नाही. तथापि हा खर्च त्यांनी त्यास विज जोडणीचे काम पूर्ण झाले अगोदर केलेले आहे. हे गृहीत धरावे लागेल कारण Infrastructure उभारल्या शिवाय त्यांना विज जोडणी देणे शक्य नव्हते. जाबदाराचे पत्र क्र. ०८६ दिनांक १०.०४.२००७ चे पत्राप्रमाणे मंजूरी पत्रातील काम पूर्ण झालेनंतर त्यास विज जोडणी देण्यात आलेली आहे. ही बाब तक्रारदारांनी नाकारलेली नाही. याचा अर्थ असा झाला जो काही की,Infrastructure चा खर्च तक्रारदारांने केला तो दिनांक १०.०४.२००७ च्या अगोदर केलेला आहे. तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष मंडल कार्यालय कोल्हापूर यांचेकडे आपली तक्रार दिनांक १३.०९.२०१७ ला दाखल केल्याचे दिसते आणि त्याचा निकाल अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने दिनांक १६.११.२०१७ ला २ महिन्याचे काळात दिला असल्याचे दिसते. त्यानंतर तक्रारदाराने प्रस्तुत तक्रार दिनांक ०८.०१.२०१९ ला या मंचापुढे सादर केलेली आहे. जाबदार विजवितरण कंपनीच्या कथनानुसार तक्रारदाराची तक्रार ही मुदतबाहय असल्याने या मंचास सदरची तक्रार दाखल करुन घेता येत नाही व ती चालण्यास पात्र नाही तर तक्रारदाराचे कथनानुसार , विज कायदा २००३ मध्ये अंतर्गत तक्रार निवारण कक्ष किंवा हे मंच यांच्यापुढे तक्रार दाखल करण्याकरिता कोणतीही मुदत घालून देण्यात आली नसल्याने त्या करिता कोणत्याही दुय्यम विधीनियमा (Subordinate-legislation) अन्वये अशी कालमर्यादा घालून देता येत नाही. यामुळे विनियम क्र. ६.६ हा प्रभावहिन होतो. दुसरे असे की, तक्रारदारांने केलेला Infrastructure चा खर्च , DDF वगळता इतर कोणत्याही योजनेतील Infrastructure खर्च, परत करण्याची जबाबदारी ही विज वितरण कंपनीचे असल्याचे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालामधून स्पष्ट होते, त्यामुळे ग्राहकांने केलेला वसूल खर्च करुन मागण्याचा अधिकार हा अबाधित असतो त्यामुळे तक्रारदारांला continuous cause of action असते यामुळे तक्रारदाराची तक्रार ही मुदतीत आहे, तिला मुदतीचा बाध येत नाही. तक्रारदाराने केलेला Infrastructure चा खर्च त्यास परत मिळण्याचा अधिकार आहे किंवा नाही. हा प्रश्न प्रस्तुत प्रकरणामध्ये दुय्यम दर्जाचा (secondary)आहे. जर तक्रारदाराची तक्रार मुदतबाहय असेल आणि ती खारिज करण्यास पात्र असेल तर तो प्रश्न निकालाकरिता उपस्थित होणार नाही (will not survive) .पण जर तक्रार मुदतीत असेल तर त्या मुदयावर या मंचाला निष्कर्ष द्यावा लागेल. म्हणून मुदतीचा मुद्दा प्रथम विचारात घेण्यात आलेला आहे.

ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००६ च्या विनियम क्र. ६.६ अन्वये, ज्या दिनांकास कार्यवाहीचे कारण घडले असेल त्या दिनांकापासून २ वर्षाचे आत जर गा-हाणे दाखल करण्यात आले नाही तर मंच असे गा-हाणे दाखल करुन घेणार नाही, असे स्पष्टपणे नमूद केलेले आहे. तक्रारदारांनी आपली तक्रार मुदतीत असल्याच्या विधानाकरिता मुळ तक्रार अर्ज (परिशिष्ट अ मधील पान क्र. ६ ते १३ मध्ये राज्य विज आयोग यांचे विविध निकाल विद्युत लोकपाल मुंबई मा. सर्वोच्च न्यायालयाचे सिव्हील अपिल क्र. ७८५६/२०१२ तसेच सिव्हील अपिल क्र. ४३०५/२००७ शेडयूल ऑफ चार्जेस केसमधील महाराष्ट्र राज्य विज आयोगाचे विविध निकाल यांचा उल्लेख करुन मा. सर्वोच्च न्यायालयाने अर्धन्यायीक प्राधिकरणा पुढील प्रकरणी मुदतीचा कायदा लागू पडत नाही असे निकाल दिलेले आहेत, असे प्रतिपादन केलेले आहे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. KOLHAPUR ZONE
महावितरण

11/6/2019

विजवितरण कंपनीचे परताव्याबद्दलचे विविध परिपत्रके यांचा देखील उल्लेख केलेला आहे, विस्तारभयापोटी या सर्वाचा सविस्तर उल्लेख करता येणार नाही, तथापि आम्ही त्या सर्व बाबींचा, निकालांचा साकल्याने विचार केलेला आहे.तक्रारदाराचे कथनानुसार ग्राहकाला विज पुरवठा करण्याचे दायित्व, विज कायदा, महाराष्ट्र विज नियमाक आयोग (विज पुरवठा संहिता आणि पुरवठया इतर शर्ती ) विनियम २००५ अन्वये ,परवाना धारक विज वितरण कंपनीचे असून, त्यातील कलम १८.१नुसार प्रत्येक परवाना धारक कंपनीला विज आयोगाकडे शेडयूल ऑफ चार्जेस दाखल करण्याचे बंधन आहे. शेडयूल ऑफ चार्जेस, ही विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ५० मधील सप्लाय कोड, मधील विज जोडणीसह, वितरण कंपनीने करावयाचा किंवा ग्राहकाने करावयाचा खर्च यांची आर्थिकता निश्‍चित करणारी तरतूद आहे. विज पुरवठा करण्याकरिता Infrastructure ची निर्मिती करणे ही विज वितरण कंपनीची जबाबदारी आहे व त्याकरिता आवश्यक असणारी आर्थिक तरतूद ही विद्युत अधिनियमत २००३ चे खंड ७ मधील तरतूदीनुसार टॅरिफ करण्यात येत असते. या कायदेशीरतेमुळे DDF वगळता इतर अन्य योजना, जसे की DDS /ORC/ORC(P); या कायदेशीर नव्हेत ORC(P) योजनेचे नाव Infrastructure खर्च ग्राहकांवर लादणे हे सर्वस्वी बेकायदेशीर आहे त्यामुळे तो खर्च वसूल करण्याचा ग्राहकाचा हक्क अबाधित आहे. तो त्यास कधीही बजावता येऊ शकतो. तक्रारदाराचे कथनानुसार दिनांक २०.०१.२००५ पासून विद्युत कायदा २००३ ची अमलबजावणी आपल्या देशात सुरु झालेली असून त्यातील कलम १८५ अन्वये जुने कायदे व त्यातून असलेली अधिकारीता निरसित झालेली आहे. तसेच महाराष्ट्र राज्य विज नियमक आयोग यानी निर्गमित केलेले विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठया इतर अटी , विनियम २००६ हे २० जानेवारी २००५ पासून अंमलात आलेले आहेत. त्यामध्ये कुठेही DDS/ORC /ORC(P)/CSS अशा कोणत्याही योजना मंजूरी दिलेली नाही. शेडयूल ऑफ चार्जेस, मंजूरी केस क्र. ७०/२००५ दिनांक ०८.०९.२००६ च्या आदेशांने मंजूर झालेले आहेत. त्यामध्ये देखिल या योजनाचा उल्लेख नाही किंवा त्याच्या कायदेशीरते बद्दल कोणताही उल्लेख नाही. केवळ DDF योजने खाली दिल्या जाणा-या विजजोडणी करता ग्राहकांने केलेला Infrastructure चा खर्च ग्राहकंास वसूल करता येत नाही, किंवा त्याचा परतावा मागता येत नाहीत कायदयाची ठाम परिस्थिती आहे. त्यामुळे ORC(P) योजने खाली बेकादेशीररित्या ग्राहकावर बसवण्यात आलेला Infrastructure cost चा परतावा हा अबाधित राहतो आणि तो अधिकार बजावणेकरिता कोणत्याही मुदतीचा कायदा त्यास लागू पडत नाही.

तक्रारदारांनी आपल्या तक्रार अर्जास दाव्याचे कारण मुदतीत घडले हे दाखविण्याकरता महाराष्ट्र विद्युत नियमक आयोगाचे कार्यकारी संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. यांना दिलेले पत्र क्र. MERC/TECH/FY 2017-18 /3955 दिनांक २०.०४.२०१७ , यावर आपली मदार ठेवलेली आहे. सदरच्या पत्रान्वये राज्य विज आयोगाने; मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपिल क्र. ४३०५/२००७ मध्ये पारित केलेला स्थगितीचा अंतरिम आदेश, सदरचे अपिल मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १०.११.२०१६ रोजी खारित केल्याने रद्दबातल झाला असल्याने मा. विज आयोगाच्या केस ८२/२००६ मधील दिनांक १७.०५.२००७ आणि दिनांक २१.०८.२००७ च्या आदेशानुसार काय काय पुर्तता करण्यात आलेली आहे. त्याबद्दलचा अहवाल मागविलेला आहे. या पत्रावरुन तक्रारदारास आपल्या प्रस्तुत तक्रारी करता दाव्याचे कारण निर्माण झाले असे कदापि म्हणता येत नाही. हे जरुर आहे की, मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपिल ७८५६/२०१२ मधील आपले १९.०६.२०१७ चे आदेशात राज्य विद्युत नियामक आयोगाला परवाना धारक विज वितरण कंपनीकडून आयोगाने निर्गमित केलेल्या नियम व विनियमाचे तसेच आयोगाने पारित केलेल्या आदेशाचे पालन करणे, भाग पाडण्याचे आधिकार आहेत, असे

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. KOLHAPUR ZONE
महावितरण

11/6/19

नमूद केले आहे. परंतु हया , मा. सर्वोच्च न्यायलचा निकालाचा तक्रारदारांला काय उपयोग होतो हे तक्रारदारांतर्फे स्पष्ट करण्यात आलेले नाही.

तक्रारदारांतर्फे आपल्या तक्रार अर्जात पान क्रमांक ६ ते १३ तसेच पान क्र. १४ मध्ये नमूद केलेले राज्य विज आयोगाचे निकाल, मा. सर्वोच्च न्यायालयाचे निकाल विद्युत लोकपाल यांचे निकाल विज कायदा २००३ चा कलम ६२.६ चा आधार मा. उच्च न्यायालया मुंबईचे रिटपिटिशन क्र. २७९८/२०१५ चा दिनांक १८.०१.२०१७ चा निकाल Appellate tribunal for electricity चा अपिल क्रमांक १९७/२००९ मधील दिनांक ११.०३.२०११ चा निकाल, हयांचा आधार घेतलेला आहे. हे सर्व निकाल प्रस्तुत प्रकरणाला लागु पडत नाहीत असा या मंचाचा नम्र निष्कर्ष आहे , कारण या सर्व प्रकरणांमध्ये तक्रारदार /ग्राहकाकडून परवाना धारक विज वितरण कंपनीने बेकादेशीररित्या रक्कमा वसूल केलेल्या होत्या व त्या रक्कमाच्या परताव्याची मागणी त्या त्या ग्राहकंानी केली असता त्या त्या विज वितरण कंपनीने नाकारलेली होती. प्रस्तुत प्रकरणामध्ये कुठेही, तक्रारदारांनी, एकाही अक्षराने त्याने केलेल्या Infrastructure cost च्या परताव्याची मागणी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष पुढे तक्रार दाखल करण्यापूर्वी किंवा या मंचापुढे दाखल करण्यापूर्वी , विज वितरण कंपनीकडून केलेली होती व ती मागणी वितरण कंपनीने फेटाळून लावलेली होती, असे म्हटलेले नाही. ग्राहकाला परताव्याचा हक्क असणे ही गोष्ट वेगळी परंतु त्या हक्काची अंमलबजावणी ग्राहकाने करणे व तो हक्क नाकारल्या जाणे. ही गोष्ट वेगळी तो हक्क नाकारल्या गेल्यानंतर तो हक्क नाकारलेल्या गेल्या तारखेपासून त्या हक्काच्या बजावणी करता प्रकरण दाखल करणे करिता cause of action निर्माण होते. या प्रकरणामध्ये तक्रारदाराने Infrastructure चा खर्च २००६ चे पुर्वी केला त्यानंतर त्याना विज पुरवठा करण्यात आला. तक्रारदाराचे कथनानुसार विज कायदा २००३ किंवा महाराष्ट्र राज्य विज नियमक आयोग यानी निर्गमित केलेले विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठया इतर अटी , विनियम २००६ या मध्ये कुठेही DDS या योजनेला कायदेशीरता देण्यात आलेली नाही. याचा अर्थ असा झाला की Infrastructure चा खर्च करताना तक्रारदारांना हा खर्च करण्याकरता त्यांना बेकादेशीररित्या भाग पाडले जात आहे हे माहित होते. मग प्रश्न असा उदभतो की अंतर्गत तक्रार निवारण कक्षापुढे तक्रार दाखल करण्यापूर्वी तक्रारदारांनी सदर Infrastructure चा खर्च विज वितरण कंपनीकडून का मागणी केला नाही.? २००६ साला पासून ते २०१८ सालापर्यन्त तक्रारदार शांत का बसले यानी सदर खर्च वसूल करण्याची कोणतीही कारवाई का केली नाही? नेमके २०१८ सालामध्ये सदर परतावा मागण्याकरिता काय कारण निर्माण झाले? याबाबत तक्रारदाराने कुठेही स्पष्ट उल्लेख केलेला नाही. मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठाने रिटपिटिशन क्र. ६८५९/२०१७ ते ६८६२/२०१७ मधील दिनांक ३१.०७.२०१८ च्या एकत्रित आदेशामध्ये विज कायदा २००३ चे कलम ४२ तसेच विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठया इतर अटी , विनियम २००६ मधील विनियम क्र. २ (२.१) (c ते e) तसेच विनियम क्र. ६ .१ ते ६.१० यांचा परामर्ष घेताना " The term " cause of action " would mean a legal injury caused to the consumer. In other words , it would mean a grievance of the consumer as the term " cause of action " has not been defined in the regulations, though the term" Grievance "has been defined under regulations २ (२.१ ) (c) which means any fault or imperfection or shortcoming or inadequacy etc." असे नमूद केले आहे. सदर निकालामध्ये मा. मुंबई उच्च न्यायालयाने आपले M/s. Hindustan Petroleum Corporation Ltd. V/s. Maharashtra State

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. KOLHAPUR महावितरण

11/6/19

Electricity Distribution company limited and others W.P. No. ९४५५/२००१ मधील दिनांक १९.०१.२०१२ तसेच Maharashtra State Electricity Distribution company limited and other V/s. Electricity Ombudsman , Nagpur and other , W.P. १६५०/२०१२ दिनांक १९.०१.२०१२ या दोन निकालाचा उल्लेख केलेला आहे. या दोन्ही निकालामध्ये मा. मुंबई उच्च न्यायालयाने, अंतर्गत तक्रार निवारण कक्ष हे विद्युत कायदा २००३ त्या कलम ४२(५) मध्ये उल्लेखित कलेले मंच असू शकत नाही असे म्हटलेले आहे. तथापि M/s. HPCL V/s. Maharashtra State Electricity Distribution company limited and other W.P. ९४५५/२००१ मध्ये मा. उच्च न्यायालयाने असे म्हटले होते की, कोणत्याही तक्रारदार ग्राहकांस तक्रार निवारण मंचाकडे , अंतर्गत तक्रार निवारण कक्षापुढे आपली तक्रार मांडल्याशिवाय येत नाही आणि या मंचापुढे तक्रार दाखल करण्यास निर्माण होणारे दाव्याचे कारण ( cause of action ) हे अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने जर तक्रारदाराला काही रिलीफ दिला नाही किंवा तक्रारीचे निरसन केले नाही, तर निर्माण होते असे म्हटले होते.तथापि Maharashtra State Electricity Distribution company limited and other V/s. Electricity Ombudsman , Nagpur and other , W.P. १६५०/२०१२ दिनांक १९.०१.२०१२ मुंबई उच्च न्यायालयाने " Internal consumer grievances cell is not the forum for redressal of the grievance of the consumer as contemplated by section ४२ (५) of the Act , but the C.G.R.F.is the said forum established under sub-section ५ of section ४२ . The regulation ६.६ uses the word "Forum " which obviously mean C.G.R.F. and not the I.G.R.Cell of the distribution licensees W.P. ६८५९/२०१७ ते W.P. ६८६२ /२०१७ मधील निकालात मा. उच्च न्यायालयाने वरील दोन्ही निकालामध्ये न्यायमूर्तीनी मांडलेल्या दृष्टीकोनांमध्ये फरक नाही तथापि M.S.E.D.C.L च्या केसमध्ये उच्च न्यायालयाने असे देखिल म्हटले आहे की, जरी ही एखादया ग्राहकांला अंतर्गत तक्रार निवारण कक्षासमोर तक्रार मांडवयाची असेल तर ती तक्रार Reasonable time मध्ये दाखल करणे जरुरी आहे. W.P. ६८५९/२०१७ ते W.P. ६८६२ /२०१७ मधील ग्राहकांकडून विज वितरण कंपनीने जादाचा इंधन अधिभार ( excess fuel adjustment costs ) बेकादेशीररित्या वसूल केलेला होता व तो विद्युत कायदा २००३ अन्वये स्थापित केलेल्या ग्राहक तक्रार निवारण मंचाने त्या ग्राहकांस परत करण्याचा आदेश पारित केलेला होता व तो आदेश मा. उच्च न्यायालयासमोर विचारार्थ होता. सदर प्रकरणांत मा. उच्च न्यायालयाने विज वितरण कंपनीने इंधन अधिभार वसूल करण्या करता दिलेले देयके, हे, सदर ग्राहकांना legal injury करणारे असून त्या देयकामुळे त्यातील तक्रारदाराना cause of action निर्माण झालेले होते, असे नमूद केलेले आहे. मा. उच्च न्यायालयाचा हा दंडक प्रस्तुत प्रकरणास लावण्याचा झाल्यास ज्या तारखेला तक्रारदारांनी कथित DDS योजने खाली Infrastructure चा खर्च केला त्या तारखेला तक्रारदारांना तो खर्च वसूल करण्याचा अधिकार निर्माण झाला आणि त्या तारखेला तक्रारदाराना cause of action निर्माण झाले त्यामुळे खर्च केले तारखेपासून २ वर्षाचे कालावधीत, तक्रारदारांनी ही तक्रार या मंचापुढे दाखल करणे "विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठया इतर अटी , विनियम २००६" च्या विनियम क्र. ६.६ नुसार अभिप्रेत होते . जवळ पास १२ वर्षापेक्षा जास्त कालावधीत तक्रारदार काहीही न करता गप्प बसलेले होते. या काळात त्यानी विज वितरण कंपनीला साधा लेखी अर्ज किंवा नोटीस, Infrastructure cost चा परतावा मागणारी, पाठविलेले नाही. या उशीरा करता काही एक स्पष्टीकरण तक्रारदारांकडून आलेले नाही. विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठया इतर अटी , विनियम २००६ च्या विनियम क्र. ६ मध्ये कुठेही सदरचा कालावधी कोणत्याही

11/6/21

REDRESSAL FORUM, KOL... MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

कारणाकरिता क्षम्य करावा असे प्रावधांन नाही त्यामुळे प्रस्तुत तक्रार सदर विनियमानुसार कालाबाहय असून दिला मुदतीचा बाध येतो असे या मंचाचा स्पष्ट निष्कर्ष आहे म्हणून या मंचाने वर नमूद मुद्दा क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी दिलेले आहे.

**मुद्दा क्रमांक २** :- वास्तविक प्रस्तुत तक्रार अर्जाला मुद्तीचा बाद येत असल्याने ती कायदयाने या मंचाच्या समोर चालू शकत नसल्याने, मुद्दा क्रमांक २ या मंचासमोर विचाराकरिता उपस्थित (survive ) होत नाही . तथापि जर मुद्दा क्रमांक १ चा या मंचाने काढलेला निष्कर्ष , काही कारणाने रद्द करण्यात आला तर त्या प्रसंगी मूद्दा क्रमांक २ वर काही निष्कर्ष काढणे आवश्यक ठरेल . तक्रारदारांनी जी काही केस या मंचापुढे मांडलेली आहे जे काही वरीष्ठ न्यायालयाचे निकाल व कायदयाच्या तरतूदी (जे तक्रार अर्जात सविस्तररित्या मांडलेले आहेत .) त्या वरुन तक्रारदारांना त्यानी केलेला Infrastructure चा खर्च परत मागण्याचा अधिकार आहे हे स्पष्ट दिसून येते. तथापि सदर हक्क बजावण्याकरिता प्रस्तुत प्रकरणी मुदतीच्याकायदयाचा बांध येतो सबब ही तक्रार ना मंजूर करण्यास पात्र आहे, असा या मंचाचा निष्कर्ष आहे तथापि मुद्दा क्रमांक २ वर नमूद केलेल्या कारणाकरिता
या मंचाच्या निष्कर्षाकरता उपस्थित होत नाही. सबब आम्ही मुद्दा क्रमांक २ चे उत्तर "Does not survive" असे आम्ही दिलेले आहे.

**मुद्दा क्रमांक ३** :- वरील सर्व कारणावरुन प्रस्तुत तक्रार अर्जास मुदतीचा बाध येत असल्याने व तो कायदयाने चालू शकत नसल्याने खारीज करण्यास पात्र आहे असा आमचा निष्कर्ष आहे. त्यामुळे अ म्ही खालील आदेश पारित करीत आहोत .

**आदेश**

१) तक्रार नामंजूर करण्यात येत आहे.
२) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

11/06
(एन.के.ताडे)
सदस्य सचिव

11/6/19
(ए.व्ही. देशपांडे)
अध्यक्ष

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण